

जय शिवराय एज्युकेशन सोसायटी,मुरगूड संचलित

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड

# झेप

कॉलेज विश्वातील एक विश्वसनीय अनियतकालिक

• संस्थापक : मा.खास.सदाशिवराव मंडलिक

• संपादक : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे

• कार्यकारी संपादक : प्रा. सुशांत पाटील

• सहाय्यक : डॉ. सुखदेव एकल, डॉ. सोनाली कुंभार




# नैतिक अधिष्ठान जपणारा लोकनेता : खासदार सदाशिवराव मंडलिक



## ९१ व्या जयंती निमित्त

**मुरगूड (वार्ताहर) :**

लोकनेते खासदार सदाशिवराव मंडलिक यांचा जन्म ७ ऑक्टोंबर १९३४ रोजी एका सामान्य शेतकरी कुटुंबात मुरगूड येथे झाला. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे जनरल सेक्रेटरी ते संसदेपर्यंत आणि जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे सभापती ते महाराष्ट्राच्या अर्धा डझन खात्याचे मंत्री असा राजकीय सामाजिक प्रवास करणारे कर्तृत्व संपन्न नैतिक अधिष्ठान जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकनेते खासदार सदाशिवराव मंडलिक होय. पश्चिम महाराष्ट्र आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनात एक कृतीशील नेता म्हणून खासदार सदाशिवराव मंडलिक यांचा लौकिक होता. सामाजिक जाणीवेने भारावून गेलेला लोकनेता म्हणूनच त्यांचे महत्त्व जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना अधिक वाटते. मुरगूड येथे १९६० साली जय शिवराय एज्युकेशन संस्थेची स्थापना करून मुरगूड परिसरातील गोरगरीब मुला-मुलींना उच्च शिक्षणाची सोय केली. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचे आंदोलन, गोवा मुक्ती आंदोलन, कोल्हापुरातील टोलमुक्ती आंदोलन या सगळ्या आंदोलनामध्ये मंडलिक साहेबांनी सक्रिय सहभाग घेतला. ही आंदोलनाची कामगिरी तरुण पिढीला स्फूर्तीदायक ठरली. संघटना कौशल्य आणि त्याच्या जोडीला वक्तृत्वाची साथ असल्याने प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचे नेतृत्व विकसित होत गेले. चारित्र्यसंपन्न, नैतिक अधिष्ठान जपणारे व्यक्तिमत्व, सामान्य कार्यकर्त्यावरील निष्ठा यामुळे मंडलिक साहेबांची यशस्वी वाटचाल होत गेली. कोणतीही गोष्ट करायची तर ती तळमळीने, प्रामाणिकपणे व निष्ठेने करण्याची वृत्ती साहेबांची होती. कोल्हापूर जिल्ह्यातील काळम्मावाडी प्रकल्पातील पाणी उजव्या कालव्यातून मुधाळ तिट्टा येथून वेदगंगा नदीत सोडण्याची किमया मंडलिक साहेबांनी केली. याचा फायदा वेदगंगा खोऱ्यातील कागल आणि सीमा भागातील शेतकऱ्यांना झाला. मंत्रीपदाच्या काळातील शेतकऱ्यांसाठी लक्षवेधी कामगिरी मंडलिक साहेबांनी केली. मंडलिक साहेबांनी जनसामान्यांचा आत्मविश्वास जागा केला. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा साहेबांच्यावर प्रभाव असल्याने बहुजन समाजासाठी कार्य करण्याची वृत्ती त्यांच्या अंगी होती. जनसामान्यालाच आपला चेहरा देण्याचे श्रेष्ठत्व एखाद्याच्याच भाग्याला येते ते मंडलिक साहेबांच्या भाग्याला आले. हमीदवाड्याच्या फोंड्या माळावर सहकाराचे मंदिर फुलवण्याचे काम साखर कारखान्याच्या रूपाने मंडलिक साहेबांनी केले. उत्तम प्रशासन, काटकसर यामुळे या कारखान्याने राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कार मिळवले. साहेबांनी जनतेच्या सेवेसाठीच आपल्या पदाचा आणि सत्तेचा उपयोग केला. सत्ता ही सेवेची संधी आहे, त्या संधीचे सोने कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यातून करावे ही त्यांची ठाम धारणा होती. म्हणूनच सर्व कार्यकर्त्यांचे केडर भक्कम राहिले. त्यांच्या नेतृत्वाला स्वच्छ चारित्र्याची व व्यापक विचारांची झळाळी लाभलेली असल्याने जिल्ह्याच्या राजकारणात उलाढाली झाल्या, अनेक लाटा आल्या, अनेक शक्ती निर्माण झाल्या पण त्याचा काहीही परिणाम मंडलिक साहेबांच्या वर झाला नाही. विश्वासार्हता हाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव. दिलेला शब्द आणि घेतलेली भूमिका यांच्याशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. तात्कालिक दीर्घकालीन लाभासाठी मंडलिक साहेबांनी कधी शब्द फिरवले नाहीत. वैयक्तिक, सार्वजनिक व राजकीय जीवनातील अनेक लहान मोठ्या संकटाने ते नामोहरम झाले नाहीत. संकटाशी आणि प्रतिकूल परिस्थितीशी त्यांनी संघर्ष केला. अनेक वादळात ते वटवृक्षाप्रमाणे अविचल राहिले. कोल्हापूर जिल्ह्यातील रेल्वे, काळम्मा-वाडी, चिकोत्रा, पाटगावसह जिल्ह्यातील मध्यम पाटबंधारे प्रकल्प, तसेच वेगवेगळ्या सहकारी संस्था, नवोदय विद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ग्रंथालये पूर्ण करण्यात साहेबांचा मोठा वाटा होता. वेगवेगळ्या नियतकालिकातून आणि वृत्तपत्रातून शेतीसाठी वेगळ्या अर्थसंकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला. शेतीसाठी महत्त्वाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक प्रश्नावर विधायक भूमिका घेऊन मंडलिक साहेबांनी लेखन केले. पाच दशकाहून अधिक काळ जिल्ह्याचे नेतृत्व केलेल्या मंडलिक साहेबांनी केवळ स्वतः संघर्ष केला असे नव्हे तर संघर्षातूनही राजकारण करता येते आणि प्रस्थापितांना धक्का देता येतो, हे त्यांनी आपल्या वाटचालीतून दाखवून दिले. अत्यंत संघर्षमय वाटचालीत काळाचे कठोर प्रहार झेलत हे पहाडी व्यक्तिमत्व गोरगरीब, जनसामान्य जनतेसाठी, निष्ठेने, विश्वासाने प्रगतीच्या क्षितिजाकडे अखंडपणे वाटचाल करीत होते. कार्यकर्ते हे माझे टॉनिक असे म्हणणाऱ्या मंडलिक साहेबांचे मंगळवार दिनांक १० मार्च २०१५ रोजी निधन झाले. दूरदृष्टी, समन्वय आणि सर्वव्यापी पुरोगामीत्वातून कोल्हापूर जिल्ह्याला प्रगतीपथावर नेणारा दीपस्तंभच कोसळला. सदा संघर्षाच्या एका वादळ प्रवाहाची अखेर झाली. त्यांनी केलेला संघर्ष आणि त्यांचा कोल्हापुरी बाणा सच्च्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना कायम स्फूर्तीदायक ठरेल. मंडलिक साहेबांचे हे कार्य असेच पुढे माननीय खासदार प्रा. संजय दादा मंडलिक व अॅड. विरेंद्र मंडलिक करीत आहेत. त्यांच्या ९१ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन.

**-डॉ. शिवाजी होडगे**
प्राचार्य

## मंडलिक कारखान्यावर संत बाळूमामा पशुवैद्यकीय दवाखान्याचे लोकार्पण



कारखाना कार्यस्थळावर संत बाळूमामा पशुवैद्यकीय दवाखान्याचे उद्घाटन करताना चेअरमन मा.खासदार प्रा. संजयदादा मंडलिक, श्री.आर.डी.पाटील, कार्याध्यक्ष अॅड.विरेंद्र मंडलिक, श्री.आनंदराव फराकटे, श्री.आण्णासो थोरवत व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

लोकनेते सदाशिवराव मंडलिक सहकारी साखर कारखाना सदाशिवनगर येथे जय शिवराय एज्युकेशन सोसायटी, मुरगूड यांचेमार्फत संत बाळूमामा पशुवैद्यकीय दवाखान्याचे लोकार्पण मा. खासदार व कारखान्याचे विद्यमान चेअरमन मान. संजयदादा मंडलिक यांचे हस्ते करणेत आले.

कागल तालुक्यासह कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वाढता दुग्धव्यवसाय, पशुपालन व्यवसाय, इतर पाळीव प्राणी यांची वाढती संख्या पाहता परिसरामध्ये अद्ययावत पशुवैद्यकीय सोईची कमतरता जाणवत होती. परिसरातील बऱ्याच शेतकऱ्यांना आपल्या पाळीव जनावरांच्या वैद्यकीय तपासणीसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत होते. सदरची बाब माजी खासदार संजयदादा मंडलिक यांना प्रकर्षाने जाणवत होती. यासाठी अद्ययावत रुग्णालय उभारणे गरजेचे आहे हे ओळखून सदाशिवनगर सारख्या मध्यवर्ती ठिकाणी रुग्णालय उभारणेचा निर्णय घेतला. त्यांच्या संकल्पनेतून उभारणेत आलेल्या रुग्णालयामध्ये अनेक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या दवाखान्यासाठी डॉ.नितिन आवळे, डॉ.एन.बी.लंबे व डॉ.एस.वाय.पाटील हे तज्ञ डॉक्टर सेवा देणार आहेत.

यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष अॅड.विरेंद्र मंडलिक, व्हा.चेअरमन आनंदराव फराकटे, संचालक शिवाजीराव इंगळे यांच्यासह कारखान्याचे सर्व संचालक तसेच आर.डी.पाटील, नामदेवराव मेंडके, जयसिंग भोसले, एस.व्ही.चौगुले, कार्यवाह आण्णासो थोरवत, कार्यकारी संचालक एन.वाय.पाटील, सेक्रेटरी श्री. बोंगार्डे, सिविल इंजिनियर रविंद्र कस्तुरे, कंत्राटदार सखाराम जाधव उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी केले. आभार बाळासाहेब पाटील यांनी मानले.

## अॅड. विरेंद्र मंडलिक यांच्या कृतीतून राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन



राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त मुरगूड ग्रामीण रुग्णालयातील कार्यक्रमाप्रसंगी बोलताना युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक अॅड. विरेंद्रभैया मंडलिक, यावेळी उपस्थित डॉ.अमोल पाटील व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

येथील ग्रामीण रुग्णालयासाठी उपयोगी असणाऱ्या व राजर्षी शाहू महाराजांचे वास्तव्य लाभलेल्या हेरिटेज इमारतीचे रंगकाम स्वखर्चातून करण्याचा निर्णय युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक अॅड. विरेंद्र मंडलिक यांनी घेतला. त्यांच्या निर्णया पाठोपाठ लगेच कामकाजास सुरुवात करून कामाची पूर्तता करण्यात आली. त्यांच्या या कार्याचे स्वागत सर्व शहरवासियांतून होत आहे.

यावेळी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने मुरगूड ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना युवा नेते अॅड.विरेंद्र मंडलिक यांच्या हस्ते फळे वाटप व प्रतिमापूजन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल पाटील होते. यावेळी अॅड.मंडलिक म्हणाले की शाहू महाराजांचे समाजावर अनंत उपकार आहेत. विशेषतः मुरगुडच्या विकासात त्यांचे फार मोठे योगदान आहे. मुरगूडचे ग्रामीण रुग्णालय येत्या काही दिवसात ५० खाटांचे होईल. माजी खासदार संजयदादा मंडलिक यांच्या फंडातून झालेल्या विकास कामांची पाहणी करताना इमारतीचे रंगकाम अपुरे असल्याचं निदर्शनास आल्यामुळे हेरिटेजचा दर्जा असलेल्या या इमारतीच्या रंगरंगोटीचे उर्वरित काम स्वखर्चातून करण्याचा निर्णय घेत असून आजच या कामकाजाला सुरुवात करत असल्याची घोषणा अॅड.विरेंद्र मंडलिक यांनी केली.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ.अमोल पाटील म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिरुप म्हणजे शाहू महाराज होते. शेतकऱ्यांना सिंचन, विद्यार्थ्यांना शिक्षण, महिलांना स्वातंत्र्य आणि समाजाला प्रबोधनाचा मार्ग दाखवणारे लोकराजे होते. स्वागत व प्रास्ताविक शिवसेनेच्या बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष श्री. अनिल सिध्देश्वर यांनी केले. यावेळी माजी नगराध्यक्ष नामदेवराव मेंडके, माजी उपनगराध्यक्ष जयसिंग भोसले, माजी नगरसेवक शिवाजी चौगुले, डॉ. शिवाजी भुमरे, डॉ. रवींद्र कांबळे, डॉ. तानाजी कुंभार, दीपक शिंदे यांच्यासह बहुजन आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.







## जनता गृहतारण संस्थेच्या संचालकपदी प्रा.डॉ.पी.आर.फराकटे यांची निवड



प्रा.डॉ.पी.आर.फराकटे

**मुरगूड (वार्ताहर) :**

महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.पी.आर.फराकटे यांची जनता सहकारी गृहतारण संस्था मर्यादित,आजरा शाखा कोल्हापूरकडे पाच वर्षांकरिता संचालक म्हणून निवड करण्यात आली. त्याबद्दल जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे ज. सेक्रेटरी मा.खा.संजयदादा मंडलिक, कार्याध्यक्ष विरेंद्र भैय्या मंडलिक, कार्यवाह आण्णासो थोरवत यांनी प्रा.डॉ.पी.आर.फराकटे यांचे अभिनंदन केले.

## महाविद्यालयात एनसीसीची भरती उत्साहात



एनसीसी भरतीच्या वेळी कॅडेट्सना मार्गदर्शन करताना ले. प्रा.विनोद प्रधान, सुभेदार नितीन देशमुख व संदीप निकम

**मुरगूड (वार्ताहर) :** सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी एनसीसी ची भरती महाविद्यालयाच्या मैदानावर उत्साहात पार पडली. प्राचार्य डॉ. एस.एम. होडगे, एएनओ लेफ्टनंट प्रा. व्ही.ए. प्रधान, प्रा.डॉ.सौ. माणिक पाटील, श्री.सूरज मांगले, सौ.शीतल मोरबाळे व एनसीसी कॅडेट्सनी तयारी केली. भरतीसाठी ५ महा. बटालियन एनसीसी, कोल्हापूरचे सुभेदार नितीन देशमुख व संदीप निकम उपस्थित होते. डॉ. होडगे यांनी त्यांचे स्वागत केले. धावणे, सिट अप, पुश-अप, तोंडी परीक्षा या निकषांवर एकूण २१ जागांसाठी निवड प्रक्रिया सुरळीत पार पडली.

## इतिहास विभागाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी



राजर्षी छ. शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, डॉ. एम.ए.कोळी, प्रा.डॉ.पी.आर.फराकटे व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात इतिहास विभागामार्फत राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. ज्येष्ठ प्रा.डॉ.एम.ए.कोळी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे होते. प्रा.डॉ.पी.आर.फराकटे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. कोळी यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्रा. कोळी यांनी शाहू महाराज यांच्या कार्याविषयी विचार व्यक्त केले. शाहू महाराज यांच्या दूरदृष्टीपणाचे महत्त्व आजच्या काळातील त्यांची गरजही सांगितली.

अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य होडगे यांनी शाहू महाराज यांचा जीवनप्रवास तसेच त्यांच्या एकूण कार्याचा सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील NAAC समन्वयक प्रा.सौ.एम.एस.पाटील, प्रा.ए.डी. जोशी, प्रा.टी.एच.सातपुते, प्रा.सोहनी, प्रा. सरदेसाई, प्रा. प्रधान, प्रा. साळुंखे, प्रा. विनायक माने, प्रा. दिपाली सामंत, प्रा. सोनाली कुंभार, तसेच महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी, एनसीसी चे विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना कांबळे यांनी केले तर आभार प्रा. नितेश रायकर यांनी मानले.

## युवती विकास मंचच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्साहात संपन्न



गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, उपस्थित प्रा.डॉ.एम.एस.पाटील व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथे युवती विकास मंच द्वारा गुरुपौर्णिमा उत्साहामध्ये पार पडली. कार्यक्रमाच्या प्रारंभी गुरूंना पुष्पगुच्छ देऊन वंदन करण्यात आले. यानंतर गुरूंबद्दल अनेक व्यक्तींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. अर्चना कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तदनंतर महाविद्यालयातील प्रथम वर्षाची विद्यार्थिनी भार्गवी कदम व वैष्णवी शिंदे यांनी आपल्या वक्तव्यामधून गुरूंना वंदन केले.

त्यानंतर डॉ.सौ.सोनाली कुंभार यांनी विद्यार्थ्यांना गुरूंचा महिमा सांगून सद्य परिस्थितीमध्ये कसे वागावे, कोणाचे आचरण करावे याबद्दल सांगितले. प्रा.डॉ.ए.डी.जोशी यांनी आपल्या मनोगतातून गुरूंचा महिमा सांगितला. हे सांगत असताना त्यांनी पौराणिक दाखले दिले तसेच ऐतिहासिक दाखले सुद्धा दिले व त्यानुसार विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये मार्गस्थ व्हावे असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा. रामचंद्र पाटील व डॉ. सुखदेव एकल यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर युवती विकास मंचच्या अध्यक्षा प्रा. डॉ. सौ माणिक पाटील यांनी विविध दाखले देऊन विद्यार्थ्यांना गुरूंविषयी माहिती दिली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी अध्यक्ष स्थानावरून उपस्थित प्राध्यापक वृंद व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, जीवनामध्ये मार्गस्थ होण्यासाठी सर्वांनाच गुरूंची आवश्यकता असते. गुरुविन कोण दाखवील वाट या उक्तीप्रमाणे गुरूंच्या मार्गदर्शनाने आपले जीवन सफल होते असे मार्गदर्शन केले. कोणाचे अनुकरण करू नये व कोणाचे अनुकरण करावे याबद्दल या काळामध्ये सजगता बाळगणे गरजेचे आहे असे त्यांनी मौलिक मार्गदर्शन केले. यानंतर कार्यक्रमांमध्ये आभार प्रदर्शन प्रा. सौ. मनीषा पाटील यांनी केले. या कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या गीताने करण्यात आली. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सौ दिपाली सामंत यांनी केले.

## महाविद्यालयात नागपंचमीनिमित्त 'सापः समज आणि गैरसमज'

### या विषयावर सर्पमित्र मोहिते यांचे एनसीसी विभाग अंतर्गत व्याख्यान



एनसीसी विभाग अंतर्गत व्याख्यान प्रसंगी बोलताना प्रा.संदीप मोहिते व उपस्थित मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात नागपंचमीनिमित्त 'सापः समज आणि गैरसमज' या विषयावर सर्पमित्र प्रा. संदीप मोहिते यांचे व्याख्यान एनसीसी विभाग आणि पर्यावरण संसाधन केंद्राअंतर्गत नुकतेच झाले. महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी आणि वाणिज्य विभागाचे प्रमुख लेफ्टनंट प्रा. विनोद कुमार प्रधान यांनी स्वागत केले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुरगूड परिसरात आढळणाऱ्या सापांच्या प्रजातीबद्दलची भीती आणि गैरसमज दूर केले पाहिजेत, सापांना मारण्याऐवजी त्यांचे जीव वाचवले पाहिजेत आणि एनसीसी कॅडेट्सना सैन्यात सामील झाल्यानंतर जंगलात आढळणाऱ्या सापांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबद्दल माहिती दिली पाहिजे. या कार्यक्रमात प्रा. मोहिते यांनी विद्यार्थ्यांना भारतात आढळणाऱ्या विविध विषारी, निमविषारी आणि बिनविषारी सापांची माहिती चित्रमय स्वरूपात दिली. त्यांनी उपस्थितांना कोणत्या प्रकारचा साप चावतो आणि कोणती खबरदारी घ्यावी याबद्दल सविस्तर माहिती दिली. या प्रजातीच्या सापांशी संबंधित श्रद्धा आणि अंधश्रद्धा, समज आणि गैरसमज देखील त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी सर्पपालक प्रा. संदीप मोहिते यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल त्यांनी एनसीसी आणि पर्यावरण संसाधन विभागाचेही अभिनंदन केले. भूगोल विभाग आणि पर्यावरण संसाधन केंद्राचे प्रमुख प्रा. दादासाहेब सरदेसाई यांनी उपस्थितांचे आभार मानले. तर एनसीसी तृतीय वर्षाच्या कॅडेट प्रतीक्षा राजेंद्र परीट यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी प्रा. डॉ. अशोक पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच, एनसीसी कॅडेट्सनी नियोजनासाठी विशेष प्रयत्न केले.

## राज्यशास्त्र विभागामार्फत ऑगस्ट क्रांती दिन साजरा



ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त हु. तुकाराम भारमल यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा. दिपक साळुंखे, प्रा.डी.व्ही.गोरे व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड अंतर्गत राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारताच्या स्वातंत्र्य-लढ्यातील ऐतिहासिक भारत छोडो आंदोलनाच्या स्मृतिदिनानिमित्त ऑगस्ट क्रांती दिन उत्साहात देशभक्तीपर वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी होडगे यांच्या हस्ते गारगोटी स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्मा तुकाराम भारमल यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली.

स्वागतपर प्रास्ताविक करताना प्रा.दिगंबर गोरे यांनी भारताच्या समग्र इतिहासातील सुवर्ण पान ठरलेला ९ ऑगस्ट १९४२ चा दिवस सविस्तर उलगडून दाखवला. आजच्याच दिवशी मुंबईतील गवालिया टँक मैदानावरून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी "छोडो भारत, चले जाओ" हा नारा देऊन संपूर्ण देशात स्वातंत्र्यलढ्याची मशाल पेटवली. गवालिया टँक मैदानावर पडलेली ठिणगी प्रचंड मोठ्या ज्वालेत परिवर्तित झाली आणि अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि दीडशे वर्षांची परकीय राजवट संपुष्टात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी होडगे म्हणाले की, "२१ व्या शतकातील तरुण पिढीने स्वातंत्र्याचा उपभोग घेत असताना स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. देशासाठी बलिदान देणाऱ्या ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांच्या कार्याची जाणीव समाजात राहावी, हाच क्रांती दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे." यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अद्वैत जोशी, प्रा. दीपक साळुंखे, प्रा. महादेव बेनके, प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा. नितेश रायकर, प्रा. धनाजी खतकर, प्रा. सुहास गोरुले, प्रा. अशोक पाटील, प्रा. अवधूत पाटील, प्रा. राहुल बोटे, प्रा. संदीप मोहिते, प्रा. राजेंद्र पाटील, प्रा. सुशांत पाटील, प्रा. बी.के.सारंग, श्री. सातापा कांबळे व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. संजय हेरवाडे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा स्वप्नील मेंडके यांनी केले.

## पत्रकारितेच्या माध्यमातून प्रबोधनाची गरज : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे



ग्रामीण पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, उपप्राचार्य प्रा.डॉ.एस.व्ही.पोवार, कोर्स समन्वयक प्रा. सुशांत पाटील.

**मुरगूड (वार्ताहर) :**

आजचे दाहक सामाजिक वास्तव पाहता लोकांमध्ये सामाजिक भान आणण्यासाठी पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करणे अत्यंत गरजेचे आहे असे प्रतिपादन सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी केले. ते "ग्रामीण पत्रकारिता व जनसंवाद" अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभ प्रसंगी बोलत होते. यावेळी कोर्सचे समन्वयक प्रा. सुशांत पाटील यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पत्रकारितेची ओळख व्हावी, इथल्या ग्रामीण प्रश्नांची जाणिव त्यांच्यात निर्माण होऊन ते प्रश्न त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडावेत याकरिता अनेक वर्षांपासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड यांच्यामार्फत "ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद" अभ्यासक्रम चालवला जातो. एकूण दहा विद्यार्थ्यांनी यासाठी प्रवेश घेतला होता. यामध्ये कु. प्रमिला विलास कांबळे हिने प्रथम तर श्री. विश्वनाथ पांडुरंग चौगले व कु. धनश्री धोंडीराम मगदूम यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यावेळी प्रा. स्वप्नील मेंडके, प्रा. राहुल बोटे यांचाही गौरव करण्यात आला. एकंदरीत सर्वांनी चांगले गुण प्राप्त करून १००% निकालाची परंपरा कायम राखली. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. शिवाजी पोवार यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा.डॉ. माणिक पाटील, प्रा.डी.व्ही. गोरे, प्रा. नितेश रायकर, प्रा.डी.डी. खतकर प्रा.आर.एस. पाटील आदी प्राध्यापक व ग्रामीण पत्रकारितेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगा दिन संपन्न



योग प्रात्यक्षिके करवून घेताना योगगुरू प्रा. शिल्पा कुडवे समोर उपस्थित सर्व प्राध्यापक वृंद.

**मुरगूड (वार्ताहर) :**

दादोबा मंडलिक सभागृह, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड येथे आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे आयोजन, महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाच्या वतीने, जिमखाना विभाग प्रमुख, प्रा.डॉ. शिवाजी पोवार यांनी केलेले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून योग गुरु, महाविद्यालयीन प्राध्यापिका कु. शिल्पा कुडवे या होत्या. तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी भूषविले होते. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक जिमखाना विभाग प्रमुख, प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांनी केले तर आभार प्रा. विनोद प्रधान यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व इतर उपस्थित होते. यावेळी शिल्पा कुडवे यांनी आजच्या जीवनात योगाचे महत्त्व सांगून योगातील काही आसने करून दाखविली व सर्वांच्याकडून करूनही घेतली.



# सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड

• वर्ष १६ वे • ऑक्टोबर २०२५ • पान नं.३



## वाणिज्य विभागाच्या वतीने भित्तीपत्रकाचे अनावरण




वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित भित्तिपत्रकांच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा.विनोद प्रधान व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड येथे वाणिज्य विभागाच्या वतीने Advanced Accountancy आणि Internal Auditing या विषयावरील भित्तीपत्रकाचे मा. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना अकाउंट विषयाची तत्वे आणि वैशिष्टे यांची आणि अंतर्गत हिशेब तपासणी यांची माहिती व्हावी या उद्देशाने या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. भित्तीपत्रक तयार करण्यासाठी बी. कॉम. भाग तीन च्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक बी. कॉम भाग तीन ची विद्यार्थिनी कु. वैष्णवी कुंभार हिने केले तर कु. मधुरा जाधव हिने आपले मनोगत तसेच सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ.एस.बी. पोवार, वाणिज्य विभागाचे प्रा. विनोद प्रधान, प्रा. राहुल बोटे, प्रा. संदिप मोहिते, प्रा. एस.आर. पाटील, प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा. संजय हेरवाडे यासोबतच प्रमुख पाहुणे मंडळ अधिकारी मा. सचिन हाके, मा. किरण चौगले (समन्वयक बार्टी), मा.श्री निलेश पोवार (समन्वयक सारथी), मा. श्रीमती संगीता चौगुले (ग्राममहसूल अधिकारी) तसेच बी. कॉम चे विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## शाश्वत विकासासाठी वृक्षारोपण व संवर्धन काळाची गरज : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे




महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा. डी.ए.सरदेसाई, प्रा. डी.व्ही.गोरे, प्रा. संजय हेरवाडे व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

आजच्या युगात मानवाने प्रगतीच्या शिखरावर झेप घेतली असली, तरी पर्यावरणीय समतोल ढासळल्यामुळे संपूर्ण मानवजातीपुढे गंभीर संकट उभे राहिले आहे. वाढते औद्योगीकरण, शहरीकरण, हवामानातील झपाट्याने होणारे बदल ही या संकटाची मुख्य कारणे ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर 'वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन' हे केवळ पर्यावरणीय नव्हे, तर सामाजिक, आर्थिक आणि नैतिक दृष्टिकोनातून काळाचे अत्यावश्यक कर्तव्य बनले आहे, असे प्रतिपादन सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी केले. ते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व पर्यावरण संसाधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे आणि उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार यांच्या शुभहस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ करण्यात आला. प्रा. दिगंबर गोरे यांनी कार्यक्रमाचे स्वागतपर प्रास्ताविक केले.

प्राचार्य डॉ. होडगे पुढे म्हणाले की, वृक्ष केवळ लावणे पुरेसे नाही, तर ते जगवणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही खरी जबाबदारी आहे. वृक्षसंवर्धन हा केवळ उपक्रम नसून, शाश्वत जीवनशैलीचा मूलभूत भाग असायला हवा. विद्यार्थ्यांनी 'एक विद्यार्थी – एक वृक्ष' या तत्त्वाशी बांधिलकी बाळगली पाहिजे. यावेळी महाविद्यालय परिसरात दोनशेहून अधिक नवीन वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षांच्या संवर्धनाची जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उस्कृतपणे आपल्याकडे घेतली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. अद्वैत जोशी, प्रा. दीपक साळुंखे, प्रा. सुशांत पाटील, प्रा स्वप्निल मेंडके, पर्यावरण संसाधन केंद्राचे प्रमुख दादासाहेब सरदेसाई, डॉ. माणिक पाटील यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे यांनी केले तर आभार प्रा. रामचंद्र पाटील यांनी मानले.

## महाविद्यालयामार्फत मुरगूड पोलीस बांधवांसमवेत 'रक्षाबंधन' उपक्रम साजरा




मुरगूड पोलीस बांधवांसमवेत रक्षाबंधन उपक्रम साजरा करताना उपस्थित सर्व पोलीस बांधव व महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थिनी

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथील समाजशास्त्र विभागामार्फत मुरगूड पोलीस स्टेशन येथे पोलीस बांधवांच्या समवेत रक्षाबंधन हा उपक्रम साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना राख्या बांधून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी पोलीस हवालदार संदीप ढेकळे म्हणाले की, 'रक्षाबंधन' हा उपक्रम बहिण भावाचे सुंदर असे नाते आहे. आम्ही नेहमीच तुमच्या पाठीशी मोठ्या भावासारखे तुमच्या रक्षणासाठी उभे आहोत. आम्हाला तुमच्यातीलच एक मित्र, भाऊ व मार्गदर्शक समजून तुम्ही कोणत्याही स्वरूपात पोलिसांच्याकडून मदत घेऊ शकता, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. दिपाली सामंत यांनी स्वागत व प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश व्यक्त केला. याप्रसंगी स्वाती मगदूम, योगिता आंग्रे, अस्मिता तेलवेकर, गौरी परीट व आरती या विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्ष स्थानावरून बोलत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करत असताना सांगितले की, 'रक्षा' म्हणजे 'संरक्षण' आणि 'बंधन' म्हणजे 'बांधिलकी'. म्हणजेच 'संरक्षणाची बांधिलकी' या शब्दातूनच भारतीय संस्कृतीमध्ये असणाऱ्या या सणाचे महत्त्व समजते. त्यामुळे सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी व पोलीस बांधवांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम साजरा करून त्यांच्या योगदानाला आपण सलाम करत आहोत असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. मनिषा पाटील यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एस. बी. पोवार, इतिहास विभाग प्रमुख डॉ. पी.आर. फराकटे, तसेच पोलीस उपनिरीक्षक प्रियांका वाकळे व सर्व पोलीस बांधव उपस्थित होते.

## महाविद्यालयामध्ये विवेक वाहिनीचे उद्घाटन संपन्न




विवेक वाहिनीचे औपचारिक उद्घाटन प्रसंगी उपस्थित डॉ.बी.एम.हिर्डेकर, प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा.डॉ.पी.आर.फराकटे व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये विवेक वाहिनी विभागामार्फत विवेक वाहिनीची ओळख करून देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मधील माझी परीक्षा विभाग प्रमुख डॉ. बी. एम. हिर्डेकर (अध्यक्ष जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलन समिती) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रतीक्षा परीट व अरुणा रेपे या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. त्यानंतर विवेक वाहिनी व इतिहास विभाग प्रमुख डॉ. पी. आर. फराकटे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे डॉ. बी. एम. हिर्डेकर सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या विवेकी शैलीतून बहुमोल असे मार्गदर्शन केले. आपल्या जीवनातील विवेक व अविवेक यांची ओळख त्यांनी करून दिली. त्याचबरोबर विवेकी राहणं किती गरजेचं आहे. याचे महत्त्व विविध उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी पटवून सांगितले. त्याचबरोबर भरकटलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानातून चांगली दिशा दाखवण्याचे काम सरांनी केले. अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. होडगे सर यांनीही विवेक वाहिनी चे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. व जीवनात यशस्वी होण्यासाठी विवेकाची गरज पटवून सांगितली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना कांबळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अशोक पाटील यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## तरुणांच्या सहभागातून लोकसंख्या दिनाला प्रबोधनात्मक स्वरूप : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे

### महाविद्यालयात लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यान, निबंध स्पर्धा व जनजागृती उपक्रमांचे आयोजन




लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे व उपप्राचार्य प्रा.डॉ.एस.बी.पोवार व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात दिनांक ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. "तरुणांना निष्पक्ष आणि आशादायक जगात त्यांना हवे असलेले कुटुंब निर्माण करण्यासाठी सक्षम करणे" ही सन २०२५ ची थीम या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्राचार्य डॉ. होडगे पुढे म्हणाले की, भारतातील तरुण वर्गाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विकासात मोठा वाटा असून कृषी, उद्योग, सेवा, शिक्षण, तंत्रज्ञान व नवसंशोधन क्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. वाढती लोकसंख्या ही जरी एक आव्हान असले तरी तिचा योग्य प्रकारे उपयोग केल्यास ती भारतासाठी सुवर्णसंधी ठरू शकते असे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे आयोजन अर्थशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रा. रामचंद्र पाटील आणि कु. वैष्णवी शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार, नॅक समन्वयिका डॉ. माणिक पाटील, प्रा. तानाजी सातपुते, प्रा. स्वप्निल मेंडके, प्रा. अवधूत पाटील, प्रा. सुशांत पाटील, प्रा. मनीषा पाटील, प्रा. अर्चना कांबळे, प्रा. दिपाली सामंत, प्रा. गोरुले आदी मान्यवर तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत जनजागृतीचा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संजय हेरवाडे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. सोनाली कुंभार यांनी केले. या कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन अर्थशास्त्र विभागाने केले होते.

## हिंदी विभागामार्फत रोजगारान्मुख विषयावर मार्गदर्शन



रोजगारान्मुख हिंदी विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.बी.के.सारंग, उपस्थित प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा.डॉ.एच.एम.सोहनी व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड अंतर्गत हिंदी विभागाच्या वतीने रोजगारोन्मुख हिंदी या विषयावर मार्गदर्शन पर व्याख्यान देण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे सर उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये हिंदी विभागाचे प्रा. बी के सारंग सर यांनी रोजगारोन्मुख हिंदी या विषयावर विचार मांडत असताना हिंदी भाषेतील विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध असणाऱ्या करिअरच्या संधी याबद्दल विद्यार्थ्यांना विस्तृत मार्गदर्शन केले. यामध्ये हिंदी अनुवाद सोशल मीडिया, पत्रकारिता, पटकथा लेखन, ब्लॉग लेखन, हिंदी सॉफ्टवेअर प्रतियोगी परीक्षा मध्ये हिंदी भाषेचे महत्त्व तसेच कंटेंट लेखन, सरकारी बँक, न्यायिक सेवा सिविल सर्विस, रेल्वे इत्यादी क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या अनेक संध्या हिंदी भाषिक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले. अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य शिवाजी होडगे सरांनी हिंदी विभागामार्फत आयोजित केलेला हा कार्यक्रम स्तुत्य असल्याचे गौरवोद्गार काढले.

या कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ. एच एम सोहनी सर यांनी केले सरांनी प्रास्ताविक मांडत असताना हिंदी भाषेचे महत्व तसेच हिंदी भाषेमध्ये पदवी, उच्च पदवी प्राप्त केल्यानंतर रोजी रोटी मिळवण्याच्या विविध क्षेत्रांची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे आभार विद्यार्थिनी श्वेता पाटील हिने केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी बी ए भाग एक, दोन, तीन चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदी व वाणिज्य विभागाच्या वतीने महात्मा फुले ग्रंथालयास भेट



मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना कवी गोविंद पाटील, प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथील हिंदी व वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी महात्मा फुले ग्रंथालयास अभ्यासभेट दिली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील एकूण पुस्तक संख्या, संदर्भग्रंथ, कथा, कादंबऱ्या, निबंधसंग्रह, कविता व समीक्षात्मक साहित्य यांची माहिती करून देण्यात आली. तसेच बुक बँक सुविधा, इंटरनेट सेवा, अभ्यासिका, वृत्तपत्र विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग आदींची माहितीही विद्यार्थ्यांना मिळाली. ग्रंथालय परिचर साताप्पा कांबळे व सदाशिव गिरीबुवा यांनी ग्रंथालयाचे कामकाज, संगणक प्रणालीद्वारे होणारी पुस्तकांची देवाणघेवाण व लायब्ररी कार्ड प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले. या वेळी हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.एच.एम.सोहनी यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलपेक्षा पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन करत वाचन संस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.व्ही.ए.प्रधान, प्रा.डॉ. ए.बी. पाटील, प्रा. संदीप मोहिते, प्रा.बी.के.सारंग, प्रा.राहुल बोटे, प्रा.एस.आर.पाटील, ग्रंथपाल प्रांजली सातपुते यांची उपस्थिती होती. या शैक्षणिक उपक्रमात दोन्ही बाजूंनी विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.







## तरुणांनी शिक्षण सोडून वाममार्गाला जाऊ नये : श्री शिवाजी करे



अंमली पदार्थ विरोधी कार्यक्रमात बोलताना स.पोलीस निरीक्षक मा.शिवाजी करे, उपस्थित प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा.डॉ.एम.एस.पाटील व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

"तरुणांच्या आयुष्यामध्ये नशा नको तर दिशा हवी" असे प्रतिपादन मुरगूड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी करे यांनी केले. ते सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड मध्ये अंतर्गत तक्रार निवारण समितीमार्फत आयोजित केलेल्या अमली पदार्थ विरोधात झिरो मिशन अंतर्गत आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये बोलत होते. त्यांनी आपल्या विवेचना मधून तरुणाई समोरच्या अनेक समस्या उलगडून दाखवल्या. ते म्हणाले की युवकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता आपल्या जीवनातील ध्येय साध्य करावे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी अंतर्गत तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ.सौ. माणिक पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले व कार्यक्रमाचा उद्देश व्यक्त केला.

आजची तरुणाई इंस्टाग्राम, फेसबुक अशा अनेक सोशल साइट्स मध्ये गुंतलेली आहे. पण हे करत असताना त्यांनी त्याचा अतिरेक करू नये. बरीचशी तरुणाई आज सायबर फ्रॉड मध्ये अडकण्याचा धोका निर्माण झालेला आहे. या प्रसंगी मा. श्री. शिवाजी करे यांनी तरुणांना सायबर फ्रॉड, डिजिटल अरेस्ट यासारख्या संकल्पना समजावून सांगून त्यापासून सावध राहण्याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी टोल फ्री नंबर्स व पोलिसांच्या सहकार्याने कशा पद्धतीने आपण समाजामध्ये सुरक्षित राहू शकतो याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी सांगितले की, आयुष्य हे अनमोल आहे. आयुष्याच्या प्रत्येक पावलावर सावधानतेने पाऊल टाका आणि कष्ट करत रहा. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आपले ध्येय साध्य करा. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांनी केले. याप्रसंगी श्री प्रशांत गोजारी (सहाय्यक फौजदार, मुरगूड पोलीस स्टेशन) तसेच श्री. अरविंद सोलापुरे (पोलीस हवालदार) उपस्थित होते. याप्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख लेफ्टनंट प्रा. विनोद प्रधान, सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी आणि प्राध्यापक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुशांत पाटील यांनी केले.

## समाजशास्त्र विभागाच्या वतीने LGBTQIA+ समुदायाविषयी भित्तिपत्रकांचे उद्घाटन




समाजशास्त्र विभागामार्फत आयोजित भित्तीपत्रकांची पाहणी करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्राचार्य डॉ.उदयकुमार शिंदे व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, समाजशास्त्र विभागामार्फत LGBTQIA+ समुदाय : समस्या, समज आणि गैरसमज " या विषयासंदर्भात समाजशास्त्र विभागातील विद्यार्थिनीं कडून तृतीयपंथी समुदाय या विषयावर अतिशय सुंदर अशी भित्तिपत्रके तयार करण्यात आली. त्याचे उद्घाटन कर्मवीर हिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उदयकुमार शिंदे त्याच-बरोबर प्रमुख वक्ते प्रा.डॉ.प्रतिभा देसाई समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, तृतीयपंथी समुदायातील मा. शिवानीताई गजबर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार, अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा. डॉ. दिपाली सामंत, प्रा. मनीषा पाटील व इतर मान्यवर उपस्थितीत उद्घाटन पार पडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविक स्वाती मगदूम या विद्यार्थिनीने केले. त्यानंतर भित्तिपत्रक तयार केलेल्या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख मान्यवरांनी भित्तीपत्रकासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी तृतीयपंथीय समुदायातील यशस्वी झालेल्या व्यक्ती यांच्यावर भाष्य केले. त्या समुदायाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. स्वाती मगदूम या विद्यार्थिनीने केले. तर आभार कु. मलप्रभा निलजकर यांनी मानले.

## कॉमर्स विभागाच्या वतीने करिअर गाईडन्स शिबिर



करिअर संधींबद्दल मार्गदर्शन करताना श्री.चेतन गोडबोले, उपस्थित प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे,उपप्राचार्य प्रा.डॉ.एस.बी.पोवार व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथे कॉमर्स विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी करिअर गाईडन्स शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नामवंत मार्गदर्शक श्री. चेतन गोडबोले, निलया फाउंडेशन, पुणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे होते. श्री. चेतन गोडबोले यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणातील विविध पर्याय, स्पर्धा परीक्षा, रोजगाराच्या संधी तसेच करिअर निवडताना लक्षात घ्यावयाच्या बाबींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी "करिअरची दिशा ठरवताना आपली आवड, कौशल्ये आणि संधी यांचा संगम साधणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन केले. तसेच याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "विद्यार्थ्यांना योग्य दिशा व प्रेरणा देणे ही महाविद्यालयाची जबाबदारी आहे. करिअर गाईडन्ससारखे उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांचा योग्य वापर करून उज्ज्वल भविष्य घडविण्यास मदत करतात. शिक्षणासोबतच योग्य मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी निश्चितच यशाच्या शिखरावर पोहोचतात."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी कुंभार यांनी केले आभार प्रदर्शन करताना कॉमर्स विभाग प्रमुख प्रा. विनोद प्रधान म्हणाले, "या करिअर गाईडन्स शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन केलेल्या श्री. चेतन गोडबोले यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वीकारून प्रेरणादायी मनोगत व्यक्त करणारे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार, ग्रंथालय प्रमुख प्रा. सातपुते, प्रा. राहुल बोटे, प्रा. संदीप मोहिते, प्रा. सुनील पाटील, प्रा. स्वप्निल मेंडके, प्रा. रामचंद्र पाटील, प्रा. हेरवाडे, प्रा.गोरुले, प्रा. पाटील, कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करणारे सर्व प्राध्यापक, कॉमर्सचे सर्व विद्यार्थी, सूत्रसंचालन करणारी वैष्णवी कुंभार आणि उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद देणारे कॉमर्स विभागाचे सर्व विद्यार्थी यांचेही मनःपूर्वक आभार मानले.

## शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे माध्यम : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे



राष्ट्रीय सेवा योजना सप्ताह निमित्त शिक्षक दिन व शिक्षक सन्मान अशा संयुक्त कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी शिक्षक

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड अंतर्गत राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी होडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी "शिक्षण हेच खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील दीपस्तंभ आहेत," असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ जे. पी. नाईक व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण क्षेत्रातील बहुमोल योगदानाचे स्मरण करून आणि त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा वेध घेऊन विद्यार्थी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख व्याख्याते ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ प्रा. पांडुरंग सारंग यांनी शिक्षण हे समाज परिवर्तनाचा शाश्वत साधन असल्याचे प्रतिपादन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपक साळुंखे यांनी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या माध्यमातून होत असलेले विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचा आढावा प्रास्ताविकेतून मांडला.यावेळी शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या विद्यार्थीप्रिय प्राध्यापकांचा आर्ट्स फॅकल्टी प्रो. डॉ. माणिक पाटील, कॉमर्स फॅकल्टी लेफ्ट. विनोदकुमार प्रधान, सायन्स फॅकल्टी प्रा तेजस्विनी कांबळे, बीसीए फॅकल्टी प्रा. विनायक माने यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ एस बी पोवार, लेफ्ट. विनोदकुमार प्रधान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी प्राचार्य कु.प्राची फराकटे, उपप्राचार्य कु.आरती गिरीबुवा, प्रशासकीय सेवक कु. अभिषेक पाटील व विद्यार्थी प्राध्यापक यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी कु.वैष्णवी कुंभार, कु.प्राची फराकटे ,कु.आरती गिरीबुवा यांनी विद्यार्थी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. रामचंद्र पाटील, प्रा. सुशांत पाटील, प्रा. स्वप्निल मेंडके, प्रा. अवधूत पाटील, डॉ. धनाजी खतकर, प्रा. दादासाहेब सरदेसाई, डॉ एच. एम. सोहणी, प्रा. सुहास गोरूले, प्रा. राहुल बोटे, प्रा. राजेंद्र पाटील,प्रा मनीषा सावेकर, प्रा. अर्चना कांबळे, सतीश खराडे, सुमित जाधव, सुनील कडाकणे व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. दिगंबर गोरे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा संजय हेरवाडे यांनी केले. या कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाने केले होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या या उपक्रमास संस्थेचे सेक्रेटरी मा.खासदार संजय दादा मंडलिक, कार्याध्यक्ष मा. वीरेंद्र भैय्या मंडलिक यांची प्रेरणा तसेच महाविद्यालयातील सर्व घटक यांचे विशेष सहकार्य लाभले.

## व्याकरण म्हणजे सर्व भाषेचा पाया : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे



इंग्रजी विभागामार्फत आयोजित भित्तिपत्रकांच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, लेफ्ट.प्रा.विनोद प्रधान, व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात इंग्रजी विभागामार्फत नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार अभ्यासक्रमावर आधारित भित्तीपत्रकाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते नुकतेच उत्साहात पार पडले.

बी.ए. भाग १ च्या कु. भार्गवी रणजीत कदम हिने उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर विषय शिक्षक लेफ्टनंट प्रा. विनोदकुमार प्रधान यांनी प्रास्ताविक सादर करताना भित्तीपत्रकाचे अभ्यासपूरक उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील महत्त्व विशद केले. आपल्या उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. होडगे यांनी भित्तीपत्रके तयार केलेल्या विद्यार्थ्यांचे व इंग्रजी विभागाच्या प्रा. प्रधान यांचे कौतुक केले. प्रत्येक भाषेतील व्याकरण हा त्या भाषेचा पाया असतो आणि तो भक्कम झाला, तरच विविध भाषिक कौशल्यांवर आपण प्रभुत्व मिळवू शकतो असे ते म्हणाले. मोबाईलच्या युगात पायाभूत शिक्षण दुरावत चालेले असताना इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी या भित्तीपत्रक उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेतला याबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. असेच विद्यार्थी सहभाग असणारे उपक्रम प्रत्येक विभागाने घ्यावेत असे ते म्हणाले. कु. पूजा अरविंद राऊत हिने उपस्थित सर्वांचे आभार मानले.

सदर कार्यक्रमासाठी कु. भार्गवी रणजीत कदम, कु. पूजा अरविंद राऊत, कु. श्रध्दा संदीप सुतार, कु. क्षितिजा टिकले आणि च्या कु. वैष्णवी गणेश शिंदे या विद्यार्थिनींनी भित्तीपत्रके तयार केली. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. डॉ. पोवार, प्रा. डॉ. सौ. पाटील, प्रा. डॉ. सोहनी, डॉ. अशोक पाटील, प्रा.डी.ए. सरदेसाई, प्रा. नितेश रायकर, प्रा. सुहास गोरुले, प्रा. सौ. अर्चना कांबळे, बी.ए. व बी.कॉम. चे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## भित्तिपत्रक विद्यार्थ्यांना सर्जनशील बनवतात : मा. सचिन हाके




'पाऊसधारा' या विषयावरील भित्तीपत्रकांच्या उद्घाटन प्रसंगी मा. सचिन हाके, प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ.एस.बी.पोवार व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

भित्तिपत्रक विद्यार्थ्यांना सर्जनशील बनवतात असे प्रतिपादन मंडल अधिकारी मा. सचिन हाके यांनी केले. ते सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड येथे 'विजया 'वार्षिक अंकाच्या संपादकीय मंडळाने आयोजित केलेल्या पाऊसधारा या विषयावरील भित्तीपत्रिकांचे उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आजचा महाविद्यालयीन विद्यार्थी हा भविष्यामध्ये मोठा लेखक, थोर कलाकार, प्रतिभावंत कवी होऊ शकतो. त्यासाठी विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देणे, त्यांच्या प्रयत्नांना दिशा व आकार देणे, त्यांच्या प्रयत्नांचे गोड कौतुक करणे हे तुम्हा-आम्हा सर्वांचेच कर्तव्य आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी होडगे आपल्या मनोगतात म्हणाले की, 'विजया' वार्षिक अंकाची प्रत्येक वर्षी महाविद्यालयात निर्मिती केली जाते. उदयोन्मुख लेखकांना, कलावंतांना विविध लेख, कथा, कविता, चित्रकला इत्यादीच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यासाठी व्यासपीठ देण्यासाठी 'विजया वार्षिक अंक महत्वाची भूमिका बजावत असतो. यातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला वाव दिला जातो.

या प्रसंगी प्रमुख उपस्थितांमध्ये उपप्राचार्य डॉ. एस. बी. पोवार तसेच मा. श्री किरण चौगुले (समन्वयक बार्टी), मा. श्री निलेश पोवार (समन्वयक सारथी), मा श्रीमती संगीता चौगुले (ग्राम महसूल अधिकारी तलाठी) इत्यादी होते कार्यक्रमाचे स्वागत गौरी परीट हिने केले. तर प्रास्ताविकामध्ये लेफ्टनंट प्रा. विनोद प्रधान यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. आभार प्रदर्शन राणी गुरव हिने व्यक्त केले. या उद्घाटन प्रसंगी प्रा. दादासाहेब सरदेसाई, डॉ. अशोक पाटील, प्रा. सुहास गोरुले, प्रा. आर. डी. पाटील, प्रा. मनीषा पाटील, प्रा. स्वप्निल मेंडके, प्रा. राहुल बोटे आणि इतर प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड





## महाविद्यालयात 'विद्यार्थी सहायता जनजागृती अभियान' उत्साहात संपन्न



विद्यार्थी सहायता जनजागृती अभियानप्रसंगी उपस्थित जिल्हा प्रशासन अधिकारी, महसूल विभाग अधिकारी, निर्भया पथक, करवीर पोलीस अधिकारी व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

महाराष्ट्र शासन व सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड यांच्या संयुक्त विद्यमाने शिष्यवृत्ती विभाग आयोजित आंतरराष्ट्रीय युवक दिनानिमित्त विद्यार्थी सहायता जनजागृती अभियान उत्साहात संपन्न झाले. सुरुवातीस शिष्यवृत्ती विभागाचे प्रा. दादासाहेब सरदेसाई यांनी सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले . त्यानंतर कोल्हापूर जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांनी दिलेल्या युवक शुभ संदेशाचे वाचन एनसीसी विभागाचे लेफ्टनंट प्रा. विनोद प्रधान यांनी केले. त्यानंतर कागल विभागाचे मंडल अधिकारी मा. श्री. सचिन हाके यांनी विद्यार्थ्यांना लागणाऱ्या शासकीय दस्तावेज संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच मुरगुड येथील ई-सेवा केंद्राचे समन्वयक मा. गौरव मोर्चे यांनी विद्यार्थ्यांना लागणाऱ्या विविध शासकीय दस्तावेज व दाखल्या विषयी सविस्तर माहिती दिली. सदरच्या उपक्रमात कोल्हापूर विभाग बार्टीचे समन्वय मा. किरण चौगले यांनी सारथी, महाज्योती,अमृत, बार्टी व टार्टी या योजना विषयी पीपीटीच्या माध्यमातून शासनाच्या वेगवेगळ्या शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती दिली. तसेच सारथीचे समन्वयक मा. निलेश पोवार यांनी सारथीद्वारे आयोजित वेगवेगळ्या शासकीय योजनेची माहिती दिली. सदर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले निर्भया पथक करवीरचे पोलीस निरीक्षक मा.अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थापासून दूर राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासामध्ये सातत्य ठेवून शिष्यवृत्तीच्या माध्यमातून उत्तम करिअर घडविण्या संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा. डी.पी. साळुंखे, प्रा. डॉ. एम. एस. पाटील मॅडम, प्रा. डॉ. एच. एम. सोहनी, प्रा. डॉ. गुरुनाथ सामंत, प्रा. सौ. सावेकर मॅडम, प्रा. राम पाटील, प्रा. विनायक माने, प्रा. संजय हेरवाडे, प्रा. अशोक पाटील, प्रा. बाबुराव सारंग, प्रा. राजेंद्र पाटील, प्रा. सुहास गोरुले, प्रा. राहुल बोटे, प्रा. संदीप मोहिते, प्रा. दयानंद कांबळे, श्री. साताप्पा कांबळे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. अर्चना कांबळे व प्रा. सौ. दिपाली सामंत मॅडम यांनी केले.

## विवेक वाहिनी विभागामार्फत चमत्कारातून विज्ञान कार्यक्रमाचे आयोजन




अंनिसचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना अभिवादन करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ.एस.बी.पोवार, डॉ.पी.आर.फराकटे व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात विवेक वाहिनी विभाग व अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूर अंतर्गत चमत्कारातून विज्ञान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूरच्या प्रशिक्षण कार्यवाहक मा. स्मिता सुधीर या उपस्थित होत्या. त्याचबरोबर त्यांचे सहकारी भीमराव कांबळे उपस्थित होते. सुरुवातीला अंनिसचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विवेक वाहिनी विभाग व इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. आर. फराकटे यांनी केले. त्यानंतर प्रमुख वक्त्या स्मिता सुधीर यांनी श्रद्धा व अंधश्रद्धा यामधील तफावत दाखवून देत विविध प्रात्यक्षिकेतून ढोंगी बाबा, साधू लोक सामान्य लोकांची कशी फसवणूक करतात ते स्पष्ट करून सांगितलं. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोन कसा महत्त्वाचा आहे हेही समजावून सांगितले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. एस.एम.होडगे यांनी विवेकी विचारांचे अनमोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. एस. बी. पवार, NAAC समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. पाटील, ज्येष्ठ प्रा. डॉ. ए. डी. जोशी, एनसीसी विभाग प्रमुख प्रा. विनोद प्रधान, प्रा. अशोक पाटील, प्रा. नितेश रायकर, प्रा. सुहास गोरुले, प्रा. गुरुनाथ सामंत, प्रा. दिपाली सामंत, प्रा. सोनाली कुंभार, प्रा. दिगंबर गोरे, प्रा. बाबुराव सारंग, प्रा. राजेंद्र पाटील त्याचबरोबर महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## हिंदी दिवस मोठ्या उत्साहात साजरा



हिंदी दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा गुणगौरव करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ.एस.बी.पोवार, डॉ.एच.एम.सोहनी व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड अंतर्गत हिंदी विभागाच्या वतीने "१४ सप्टेंबर - हिंदी दिवस" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी भितीपत्रिकेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. जयसिंग कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. १४ सप्टेंबर हा हिंदी दिवस का साजरा केला जातो. या आशयावरती विद्यार्थ्यांनी भितीपत्रके बनवली होती. या नंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. जयसिंग कांबळे, अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार, प्रो. डॉ. एच. एम. सोहनी, प्रा. डी. ए. सरदेसाई, ले. प्रा. विनोद प्रधान या सर्व मान्यवरांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाली.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रो. डॉ. एच. एम. सोहनी यांनी केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे व इतर सर्व मान्यवरांचे स्वागत पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. याप्रसंगी हिंदी दिवसाचे औचित्य साधून विभागाच्या वतीने निबंध, काव्यवाचन व इतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, त्या स्पर्धेचा निकाल घोषित करून क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार सर यांनी हिंदी भाषेचे क्रीडा क्षेत्रासाठी व व्यावसायीक दृष्टिकोनातून महत्त्वाचे स्थान असल्याचे नमूद केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अशोक पाटील यांनी केला. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. जयसिंग कांबळे यांनी आपल्या मनोगतात हिंदी भाषेची आजची जगातील स्थिती, हिंदी भाषेचे महत्व, हिंदी भाषेचे राष्ट्रीय एकात्मतेमध्ये असणारे योगदान आणि हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत ते समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. शिवाजी होडगे यांनी आपल्या मनोगतात हिंदी भाषेचा उगम आणि आजपर्यंतचा प्रवास सांगून, हिंदी भाषा एकमेकांना जोडणारी भाषा आहे, ती बोलणाऱ्यांची, लिहिणाऱ्यांची, समजण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे असे सांगितले. त्याचबरोबर हिंदी साहित्याचे विविध प्रकार, हिंदी साहित्यकारांचे सामाजिक, राष्ट्रीय, सांस्कृतिक, जडणघडणीतील योगदान हे सर्वोच्च असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी ले. प्रा. विनोदकुमार प्रधान, प्रा.डी.ए. सरदेसाई, प्रा डॉ. गुरुनाथ सामंत, प्रा. दिपाली सामंत, प्रा. अर्चना कांबळे, प्रा. राम पाटील, यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रा. सुहास गोरूले यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. बी. के. सारंग यांनी केले.

## 'पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करूया' : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे आवाहन



पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याबद्दल मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, उपस्थित प्रा.डी.ए.सरदेसाई व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. शाळा- महाविद्यालयातर्फे "हरित गणेश, सुरक्षित गणेश" हा संदेश देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत त्याचाच एक भाग म्हणून सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात पर्यावरण संसाधन केंद्रामार्फत पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करूया या उपक्रमांतर्गत विद्यार्थी जनजागृती संकल्प उपक्रम घेण्यात आला. सुरुवातीस कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. दादासाहेब सरदेसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक करून उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर महाविद्यालयातील प्रा. दीपक साळुंखे यांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव कसा साजरा करावा याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी आपल्या मनोगतात 'हरित गणेश, सुरक्षित गणेश' हा संदेश दिला. तसेच पर्यावरणीय प्रदूषणाला आळा घालून पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. दिगंबर गोरे, प्रा. डॉ. गुरुनाथ सामंत, प्रा. संजय हेरवाडे, प्रा. अवधूत पाटील, प्रा. डॉ. अशोक पाटील, प्रा. राहुल बोटे, प्रा. संदीप मोहिते, प्रा. स्वप्निल मेंडके, प्रा. एस. आर. पाटील, प्रा. बाबुराव सारंग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आभार कॉमर्स फॅकल्टी हेड प्रा. विनोद प्रधान यांनी मानले.

## व्यक्तिमत्व विकास व समाजसेवेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी व्हा : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे




राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, डॉ.ए.डी.जोशी,प्रा.डी.व्ही.गोरे व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) म्हणजे शिक्षणातून समाजसेवा आणि समाजसेवेतून शिक्षण असा दुहेरी लाभमिळवून देणारी योजना आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांचा चारित्र्य विकास होतो, राष्ट्रीय एकता आणि एकात्मता दृढ होते आणि सर्वांगीण प्रगतीचा मार्ग खुला होतो अशी भूमिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी मांडली. ते सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात अध्यक्षीय मनोगता वेळी बोलत होते. "श्रम, सेवा आणि त्याग ही मूल्ये आत्मसात केल्यास विद्यार्थी घडतील," असे सांगून डॉ. होडगे यांनी विद्यार्थ्यांना एनएसएसमध्ये सहभागी होऊन समाजसेवेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना प्रा डॉ अद्वैत जोशी म्हणाले, की विद्यार्थ्यांनी श्रमाची लाज बाळगू नये. कोणतेही काम कनिष्ठ नसते. महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला' या विचारातून प्रेरणा घेऊन राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत आहे. स्वयंसेवकांनी मोबाईलपासून दूर राहून विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांतून व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा, असे ते म्हणाले. याप्रसंगी डॉ. जोशी यांचा महावीर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी झालेल्या निवडीबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रा. दीपक साळुंखे, प्रा. रामचंद्र पाटील, प्रा. राजेंद्र पाटील, स्वप्निल मेंडके, प्रा. अवधूत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. मोठ्या संख्येने स्वयंसेवकांनीही सहभाग घेतला. स्वागतपर प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. दिगंबर गोरे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. सुशांत पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे यांनी केले.

## डॉ.एस. आर. रंगनाथन हे ग्रंथालय विज्ञानाचे जनक : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे



डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, माजी ग्रंथपाल प्रा.टी.एच.सातपुते व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

डॉ.एस. आर. रंगनाथन हे ग्रंथालय विज्ञानाचे जनक म्हणून ओळखले जाते. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी केले. ते सदाशिराव मंडलिक महाविद्यालयातील महात्मा फुले ग्रंथालय आयोजित डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे बोलताना पुढे म्हणाले की, रंगनाथन यांनी आयुष्यभर ग्रंथालयासाठी मोलाचे योगदान दिले आहे. या योगदानाचा प्रभाव पुढील अनेक पिढ्यांवर पडलेला दिसतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय प्रमुख टी. एच. सातपुते यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये रंगनाथन यांच्या लायब्ररी सायन्सच्या पाच नियमांची विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे आभार ग्रंथालय परिचर सातापा कांबळे बस्तवडेकर यांनी मांडले याप्रसंगी ग्रंथालय परिचर सदाशिव गिरीबुवा, तसेच प्रा. डी.पी.साळुंखे, डॉ. सुखदेव एकल, प्रा. आर.एस.पाटील, प्रा. सोहम डाफळे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मारुती चितमपल्ली यांचे लेखन म्हणजे निसर्गाचा अनमोल ठेवा- डॉ. बी.एम. हिर्डेकर




मराठी विभागाच्या वतीने आयोजित भित्तीपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ.बी.एम.हिर्डेकर, प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, डॉ.सुखदेव एकल व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

मारुती चितमपल्ली यांचे लेखन म्हणजे निसर्गाचा अनमोल ठेवा आहे, असे प्रतिपादन डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. ते सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय येथे मराठी विभाग आयोजित मारुती चित्तमपल्ली यांच्या साहित्यावरील भित्तिपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मारुती चित्तमपल्ली हे जसे उत्तम लेखक होते तसे वन्यजीव अभ्यासकही होते. त्यांचे लेखन म्हणजे त्यांना आलेल्या अनुभवांचा खजिना आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव महादेव होडगे म्हणाले की, चितमपल्ली हे जंगलातील प्राणीजीवन आणि निसर्गाचे बारकावे रेखाटणारे, ओघवत्या शैलीत अनुभव कथन करणारे लेखक होते त्यामुळे त्यांचे लेखन हे वाचनीय आणि लोकप्रिय बनले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुखदेव एकल यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सोहम डाफळे तर आभार प्रा. आर. एस. पाटील यांनी मानले. सदरचे भित्तीपत्रक कु. चंदना भराडे, मेघा कांबळे, साऊताई कळमकर, अक्षता खराडे, प्रणाली भराडे, राहुल मगदू या विद्यार्थ्यांनी तयार केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. ए.डी. जोशी, प्रा. एम.एस. पाटील, प्रा. फराक्टे, प्रा. डी.पी. साळुंखे, प्रा. नितेश रायकर, प्रा. टी. एच. सातपुते, प्रा. विनोद प्रधान तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड

• वर्ष १६ वे • ऑक्टोबर २०२५ • पान नं.६



## शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या कोल्हापूर जिल्हा युवा महोत्सवात महाविद्यालयाचे घवघवीत यश







**मुरगूड (वार्ताहर) :** शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज येथे पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या कोल्हापूर जिल्हा युवा महोत्सवात आपल्या महाविद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले आहे. यामध्ये मूकनाट्य - द्वितीय क्रमांक , पथनाट्य - तृतीय क्रमांक, लोकनृत्य - चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. तिन्ही संघ बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी झाले होते. सर्व स्पर्धकांना संस्थेचे सेक्रेटरी प्रा.संजयदादा मंडलिक, कार्याध्यक्ष ॲड. विरेंद्र मंडलिक, प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, ओ.एस. श्री.एम.डी.भोई, मार्गदर्शक प्रा.डी.पी.साळुंखे यांचे प्रोत्साहन लाभले.

## समाजशास्त्र विभागाच्या वतीने "LGBTQIA+ समुदाय: समस्या, समज आणि गैरसमज " या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न



अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कार्यशाळेच्या प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रमुख पाहुणे,सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी

**मुरगूड (वार्ताहर) :**

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत समाजशास्त्र विभागामार्फत "LGBTQIA+ समुदाय : समस्या, समज आणि गैरसमज" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा.डॉ. दिपाली सामंत यांनी केले. कार्यशाळेचे उद्घाटन कर्मवीर हिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे यांच्या हस्ते झाले. बीजभाषणामध्ये त्यांनी तृतीयपंथी समुदायाची एकूण जगातील आकडेवारी सांगून, तृतीयपंथी व्यक्तींना समाजात भेदभाव, हिंसाचार व उपेक्षा अशा अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते याविषयी मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळा तीन सत्रात पार पडली. प्रथम सत्रासाठी साधन व्यक्ती म्हणून लाभलेल्या प्रा.डॉ. प्रतिभा देसाई यांनी तृतीयपंथी यांना कायद्यामध्ये असणाऱ्या तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये तृतीयपंथी समुदायातील मा. शिवानीताई गजबर (विभागीय सह-अध्यक्ष, तृतीयपंथी हक्क संरक्षण व कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य) यांनी त्यांना स्वतःला आलेले अनुभव सांगून विद्यार्थ्यांच्या समोर तृतीयपंथी व्यक्तींच्या व्यथा आणि वास्तव तसेच त्यांना कुटुंबाशी, समाजाशी व स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी करावा लागलेला संघर्ष या संदर्भात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यानंतर तृतीय सत्राचे साधन व्यक्ती प्रा. अरविंद घोडके यांनी LGBTQIA+ समुदायाविषयी संशोधन करत असताना त्यांना आलेले भावनिक अनुभव विद्यार्थ्यांच्या समोर व्यक्त केले. एकूणच ही कार्यशाळा तृतीयपंथी समुदायाविषयी असलेल्या शंका, प्रश्न आणि गैरसमज दूर करून विद्यार्थ्यांना एक समज देणारी,संवेदनशीलता आणि बांधिलकीची जाणीव करून देणारी ठरली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून बोल-ताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी तृतीयपंथी समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे,अशी भावना व्यक्त केली. याप्रसंगी प्रा.डॉ. डी.के.पाटील, प्रा.डॉ. धनाजी पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदरच्या कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार, अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. दादासाहेब सरदेसाई, लेफ्ट. विनोद प्रधान, प्रा. अशोक पाटील, प्रा. बी के सारंग, प्रा. गुरुनाथ सामंत, प्रा. सुहास गोरूले, प्रा. अवधूत पाटील, प्रा. सुशांत पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आणि समाजशास्त्र विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यशाळेचे संयोजन समन्वयिका प्रा.डॉ. दिपाली सामंत व सहसमन्वयिका प्रा. मनिषा पाटील यांनी केले. सदरच्या कार्यशाळेत अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व १३ महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते. सदरच्या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.अर्चना कांबळे, प्रा.डॉ.सोनाली कुंभार यांनी केले तर आभार प्रा. नितेश रायकर यांनी मानले.

## जागतिक सूक्ष्मजीव दिनानिमित्त 'फर्मेन्टेड फूड्स' स्पर्धा: पारंपरिक पदार्थांना आधुनिक वळण





जागतिक सूक्ष्मजीव दिनानिमित्त आयोजित स्पर्धेप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, उपस्थित प्राध्यापक वृंद व स्पर्धक विद्यार्थी

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड कॉलेज मध्ये जागतिक सूक्ष्मजीव दिनाचे (World Microorganisms Day) औचित्य साधून नुकतीच एक विशेष 'फर्मेन्टेड फूड्स' (आंबवलेले पदार्थ) स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश, दैनंदिन जीवनातील आंबवलेल्या पदार्थांचे महत्त्व आणि त्यांचे आरोग्यासाठी असलेले फायदे याबद्दल जागरूकता वाढवणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मायक्रोबायोलॉजी डिपार्टमेंटच्या प्रा. आदिती बांबरे यांनी केले. त्यानंतर, World Microorganisms Day वरती बोलताना, महाविद्यालयातील मायक्रोबायोलॉजी डिपार्टमेंटच्या हेड प्रा. तेजस्विनी कांबळे म्हणाल्या, "फर्मेन्टेड फूड्स हे आपल्या पचनसंस्थेसाठी अत्यंत फायदेशीर आहेत. यात असलेले प्रोबायोटिक्स (Probiotics) आतड्यांमधील चांगल्या बॅक्टेरियांची वाढ करतात, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. अशा स्पर्धांमुळे नवीन पिढीला आपल्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे महत्त्व पुन्हा एकदा पटते." तसेच प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी कार्यक्रमात बोलताना मायक्रोबायोलॉजी विषयाचे महत्व सर्वांना समजून सांगितले उपप्राचार्य डॉ. एस.बी. पोवार यांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सर्व स्पर्धकांनी आपापल्या पदार्थांचे सादरीकरण केले. यात इडली, डोसा, दही, लोणची, केक, आंबील, यांसारख्या पारंपरिक पदार्थांपासून ते किमची (Kimchi), सौअरक्राऊट, कोम्बुचा (Kombucha) यांसारख्या आंतरराष्ट्रीय पदार्थांपर्यंत अनेक वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थ पाहायला मिळाले. प्रत्येक स्पर्धकाने आपल्या पदार्थांमधील सूक्ष्मजीवांचे महत्त्व आणि त्यांच्या निर्मितीची प्रक्रिया याबद्दल माहिती दिली. यावेळी परीक्षणानंतर या स्पर्धेतील विजेत्यांची घोषणा करण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक B.Sc III चा सुमित कांबळे यांनी सादर केलेल्या 'विविध डाळींच्या पासून इडली' साठी, द्वितीय क्रमांक B.Sc II ची अनघा खराडे, यांनी सोलकढी यासाठी तर तृतीय क्रमांक- B.Sc I ची कु. असावरी राजिगीरी, हिच्या 'नाचणीच्या इडल्या' साठी प्राप्त झाला.

विजेत्यांना सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयामधील अनेक शिक्षक खवय्ये आणि आरोग्यप्रेमींनी हजेरी लावली होती. पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देणाऱ्या अशा स्पर्धा भविष्यातही आयोजित केल्या जातील, असे आयोजकांनी सांगितले. सदर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.विनोद प्रधान, प्रा.डॉ.एम एस पाटील यांनी काम पाहिले. कार्यक्रमाची सांगता मायक्रोबायोलॉजी डिपार्टमेंटच्या प्रा. समृद्धी मोरे यांनी आभार मानून केली. कार्यक्रमास बीएससी डिपार्टमेंट व बीसीए डिपार्टमेंटचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

## बीसीए विभागातर्फे 'सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट' या विषयावर कार्यशाळा संपन्न




बीसीए विभाग आयोजित 'सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट' कार्यशाळेच्या प्रसंगी उपस्थित श्री.अनिल वाघोजी, प्रा.विनायक माने व विद्यार्थी-विद्यार्थिनी

**मुरगूड (वार्ताहर) :**

बीसीए विभागातर्फे सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांचे प्रोग्रॅमिंग ज्ञान व तांत्रिक कौशल्य वाढविणे तसेच उद्योग क्षेत्रातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांना सिद्ध करणे हे होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य पाहुणे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते झाले. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना नावीन्य, समस्यांचे निराकरण आणि सातत्यपूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच भविष्यातील संधी साधण्यासाठी विद्यार्थ्यांनी कोडिंगमध्ये भक्कम पाया तयार करण्याचे आवाहन केले. या कार्यशाळेचे मार्गदर्शन श्री. अनिल वाघोजी यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोग्रॅमिंगची मूलभूत तत्त्वे, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट लाईफ सायकल (SDLC), तसेच उद्योगक्षेत्रातील सर्वोत्तम पद्धती याबाबत माहिती दिली. प्रत्यक्ष कोडिंग सराव व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वास्तवातील प्रकल्पांचे ज्ञान मिळाले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. विनायक माने (विभागप्रमुख बीसीए), प्रा. शितल मोरबळे, प्रा. नेहा हवालदार, प्रा. अमृता पाटील व प्रा. शिल्पा कुडवे या प्राध्यापकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या समन्वयामुळे कार्यशाळा सुरळीत पार पडली.

शेवटी विद्यार्थ्यांच्या प्रश्नोत्तर सत्रानंतर कार्यशाळेचा समारोप आला. विद्यार्थ्यांनी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरल्याचे सांगितले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. एकंदरीत ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक ज्ञान व उद्योगातील अपेक्षा यामधील दुवा साधणारा एक महत्त्वपूर्ण अनुभव ठरला.

## अखंड भारताचे स्वप्न लोहपुरुषांच्या दृढ नेतृत्वामुळेच : प्रा. सुशांत पाटील




NSS च्या वतीने आयोजित व्याख्यान प्रसंगी बोलताना प्रा.सुशांत पाटील, उपस्थित प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा.दिपक साळुंखे, डॉ.पी.आर.फराकटे व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

"स्वातंत्र्यानंतर भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे संस्थानांचे विलीनीकरण होते. त्यावेळी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रगल्भ, दूरदृष्टीपूर्ण व दृढ नेतृत्वामुळे जवळपास ५६५ संस्थाने भारतात विलीन झाली. त्यांच्या या ऐतिहासिक कार्यामुळे अखंड भारताचे स्वप्न साकार झाले" असे प्रतिपादन प्रा. सुशांत पाटील यांनी केले. ते सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष व्याख्यान प्रसंगी बोलत होते. प्रा. पाटील पुढे म्हणाले की "ऑपरेशन पोलो" सारख्या कठोर पण ऐतिहासिक निर्णयामुळे हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले, तसेच देशाच्या ऐक्यासाठी पटेलांचे योगदान अढळ व प्रेरणादायी आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी स्वागतपर प्रास्ताविक प्रा. दिगंबर गोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे म्हणाले की, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांचे राष्ट्र निर्मितीत बहुमोल योगदान आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी राष्ट्रसेवेत सहभागी व्हावे. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपक साळुंखे, प्रा. नितेश रायकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ.पी. आर. फराकटे, प्रा.डॉ.एच.एम.सोहनी, लेफ्टनंट प्रा.व्ही. ए.प्रधान, प्रा. स्वप्नील मेंडके, प्रा.डॉ.धनाजी खतकर, प्रा. अवधूत पाटील, प्रा. अशोक पाटील, प्रा. संदीप मोहिते, प्रा. दयानंद कांबळे, प्रा सुहास गोरूले उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा.रामचंद्र पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे यांनी केले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.